## वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचा नमुना

## -पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३-०६-२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार **पोलीस अधिक्षक, अकोला** यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई (१९५) यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदपत्र संगणकीय प्रणालीव्दारे **दिनांक ०५/०३/२०२४ ते दि. ३१/०३/२०२४ या कालावधीत** स्विकारण्यात येतील. याबाबत सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024 .mahait.org या संकेतस्थळांवर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहीती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल. व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी अयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरते वेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारामधून संबंधित प्रवर्गामधील जाहीरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात यईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी या मध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०-१२-२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यंात येईल.**
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता,आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहीती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहीती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहीरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहु जाहिरात उमेदवारांनी काळजीपुर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच,सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथाकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेवुन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रियेदरम्यान शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरतीप्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेवुनच उमेदवारांने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार **खुल्या प्रवर्गात (Unreserved)** अर्ज करू शकतात, **परंतू खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करू शकणार नाहीत.**
- **पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचीका क्र.२८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय,मुंबई यानी जनहीत याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७-०६-२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरूध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणणा केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवु शकतो व त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.**

(बच्चन सिंह)
पोलीस अधीक्षक, अकोला

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात**

**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन-२०२२-२०२३**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला**

जाहिरात क्रमांक- 2813 /२०२४, ठिकाण- अकोला दिनांक- 29/2/24

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३-०६-२०२२ च्याा आदेशांन्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस अधिक्षक, अकोला यांच्या आस्थापनेवर सन-२०२२-२३ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी (१९५) पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) पोलीस शिपाई**

| | अ.जा | अ.ज | वि.जा-अ | भ.ज-ब | भ.ज-क | भ.ज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | **25** | **14** | **6** | **5** | **7** | **4** | **4** | **37** | **20** | **19** | **54** | **195** |
| कप्पीकृत आरक्षण ↓ | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | 7 | 4 | 3 | 2 | 4 | 2 | 2 | 10 | 6 | 5 | 15 | **60** |
| **महिला** | 8 | 4 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 11 | 6 | 6 | 16 | **59** |
| **खेळाडु** | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | **9** |
| **प्रकल्पग्रस्त** | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | **9** |
| **भुकंपग्रस्त** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | **3** |
| **माजी सैनिक** | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 6 | 3 | 3 | 8 | **31** |
| **अंशकालीन पदवीधर** | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | **9** |
| **पोलीस पाल्य** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | **6** |
| **गृहरक्षक दल** | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | **9** |
| **एकुण** | **25** | **14** | **6** | **5** | **7** | **4** | **4** | **37** | **20** | **19** | **54** | **195** |
| **अनाथ** | | **महीला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक,२३-०८-२०२१ नुसार एकुण रिक्त पदांच्या १ टक्का प्रमाणे २ पदे** | | | | | | | | | | |

(बच्चन सिंह)
**पोलीस अधीक्षक,अकोला.**

CamScanner